Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# मराठवाडयातील ललित गद्य व विद्यापीठ 'नामांतर चळवळ' काही संदर्भ व नोंदी

**उध्दव राधाकृष्ण बिन्नीवाले**
संशोधक विद्यार्थी (Ph.D.)
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ, औरंगाबाद
मो.नं.७७९८६११३९५
urbinniwale@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे म्हणुन ८जुलै १९४५ रोजी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून १९४६ मध्ये मुंबईत 'सिध्दार्थ कला व विज्ञान महाविद्यालय' आणि मराठवाडयातील औरंगाबादमध्ये १९५० मध्ये 'मिलिंद महाविद्यालयाची' स्थापना होते, या आगोदरपासूनच बाबासाहेबांची औरंगाबाद व मराठवाडयाच्या इतर भागात भेट दिल्याची नोंद आहे. डॉ. बाबासाहेबांनी १९३४ साली दौलताबादच्या किल्ल्यास भेट दिली होती आणि तेथील हौदाच्या पाण्याने हातपाय धुतले होते म्हणुन तेथील मुस्लीम शिपायाने अपमान केला होता याची नोंद बी. व्ही. जोंधळे 'औरंगाबादेत बाबासाहेब' या पुस्तकात करतात. यापूर्वीच म्हणजे १० ऑक्टोंबर १९३३ साली बाबासाहेबांनी औरंगाबादेत पहिली भेट दिल्याचे लेखन बी.व्ही.जोंधळे सांगतात, '**दौलताबादचा अपमानजनक प्रकार घडण्यापूर्वी बाबासाहेबांनी १० ऑक्टोंबर १९३३ रोजी औरंगाबादेत पहिली भेट दिली होती.**'[१] या भेटीत व १९३४ च्या दौलताबादच्या भेटीत त्यांना मराठवाडयातील सर्वांगीन मागासलेपण दिसून आले होते व त्याचबरोबर अस्पृश्यांचे शोषण अधिकच होते आहे म्हणुन डॉ. आंबेडकरांनी नागसेनवन परिसरात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना २१ जून १९५० रोजी केली. सुरुवातीस हे महाविद्यालय छावणी परिसरामध्ये भरत असे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मराठवाडयाशी असा संबंध आला त्यातून मिलिंद महाविद्यालयाची स्थापना झाली. मराठवाडा हा शैक्षणिकदृष्टया खूप मागास आहे म्हणुन मराठवाडयात एक विद्यापीठ असावे असा विचारही त्यांनी अनेकदा मांडला. याच विचारातून २३ ऑगस्ट १९५८ रोजी पंडीत नेहरुंच्या हस्ते मराठवाडा विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली व पुढे १९७० च्या नंतर आंबेडकरवादी संघटना, नेते, सामाजिक कार्यकर्ते यांनी मराठवाडा विद्यापीठाची पहिल्यांदा मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली व त्यांचे शैक्षणिक योगदान मराठवाडयासंबंधीत मोठे आहे म्हणून अनेक पुरोगामी संघटना व विचारवंतानी ही मागणी सरकार दरबारी १९७६ पासून मांडायला व रस्त्यावर उतरायला सुरुवात केली. नामांतरवादी गट जसा निर्माण झाला तसा नामांतरविरोधी गट देखील निर्माण झाला नामांतराचा हा लढा १८ ते २० वर्ष चालला, यात नामांतरविरोधी गटाने व जात्यांध गटांनी अनेकदा नामांतरवाद्यांना मारहाण केली, घरेदारे जाळले अमानुष अन्याय - अत्याचार झाले, अनेक घडामोडीनंतर शरद पवार मुख्यमंत्री असताना १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार करण्यात आला. अनेक वैचारिक जानकारांना हा लढा किंवा चळवळ झालीच कशी म्हणजेच बाबासाहेबांचे नांव विद्यापीठाला सहज मिळायला हवे होते हा त्यामागचा उदार दृष्टीकोन परंतु

जातीयवाद्यांनी व परंपरावाद्यांनी पुन्हा एकदा आपले खरे रुप दाखवले होते हा इतिहास सर्वज्ञांतच आहे त्यामुळे तो थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न.

नामांतर चळवळीचे संदर्भ हळूहळू कथा, कांदबरी, कवितेतून येऊ लागले ते तसे मराठवाडयातील मोजक्या ललित गद्यामधूनही एका वाक्यात, स्फूट स्वरुपात, संदर्भवजा स्वरुपात येऊ लागले. एव्हाना ललितगद्यामध्ये नाही म्हटले तरी बरीच वाढ झाली होती. ललित गद्याचे विविध प्रकार जोमाने नसले तरी सावकाश का होईना वाढत होते हे विशेष होय. यामध्ये आठवणी/अनुभव, लघुनिबंध, प्रवासलेखन, व्यक्तिचित्रण व ललितलेखसंग्रह यांचा समावेश होतो या ललितगद्याच्या काही उपप्रकारांमधून लक्षात घ्याव्या अशा विद्यापीठ नामांतरचळवळीच्या बारीकशा नोंदी किंवा संदर्भ आले आहेत परंतु त्या खुप महत्वपूर्ण व मूल्ययूक्त आहेत हे विशेष सांगणे गरजेचे आहे.

यू. म. पठाण यांच्या 'मराठवाडी' या आठवणीच्या पुस्तकांमधून जनार्दन वाघमारे यांच्या निमित्ताने नामांतर चळवळीचा उल्लेख येते. 'मराठवाडा विद्यापीठा'चे नामांतर होऊन दोन विद्यापीठे निर्माण झाली. एक 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद' तर दुसरे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड' याच विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणुन जनार्दन वाघमारे यांची नियुक्ती होते याचाही उल्लेख येतो.

गंगाधर पानतावणे यांच्या 'स्मृतिशेष' या दिवंगत झालेल्या व्यक्तींच्या चित्रणामधून नामांतर चळवळीचे बऱ्यापैकी संदर्भ येतात. नामांतर चळवळीच्या निमित्ताने नामांतरविरोधी गटांनी मराठवाडयातील खेडयापाडयात केलेली जाळपोळी विषयी लेखक पु. ल. देशपांडे यांना माहिती देतात, **'मराठवाडयातील जातीय हल्ल्यांनी सैरभैर झालेल्या दलितांच्या वेदना व्यक्त करणारं पत्र जेव्हा मी पु. ल. ना लिहिलं तेव्हा त्यांनी केवळ सहसंवेदना व्यक्त केली नाही तर भारतीय समाजव्यवस्थेच्या एका मग्रूर व बेमुर्वतखोर प्रवृत्तीचा कसा उच्छेद करता येईल याचा विचार व्यक्त करणारं पत्र लिहीलं होतं. पु. ल. चं मन विदीर्ण झालं होतं याचा तो आलेखच होता.'**[२] नामांतरवादी चळवळीस व झालेल्या दलितांवरील अन्यायामुळे पु. लं. व्यथित होतात. मराठवाडयातील दंगलीचे चित्रन यातून पानतावणे संवेदनशील व तटस्थपणे करतात. मिलिंद महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म.भि.चिटणीस नामांतराचा पुरस्कार करुन चळवळीचे नेतृत्व करतात मात्र प्राचार्य नरहर कुरुंदकर नामांतर चळवळीस विरोध करतात याचे चित्र लेखक मांडतात. **'कधी कधी कुरुंदकर एक की दोन असा प्रश्न पडायचा, एकीकडे दलितांच्या चळवळीविषयी, साहित्यविषयी आस्थेनं विचार मांडणारा हा माणूस नामांतराविषयी कडवट विरोधाची भूमिका का घेत होता हे कोडंच होतं.'**[३] कुरुंदकराचा नामांतर चळवळी विषयीचा विरोध लेखक दाखवून देतात. नामांतर समयी दलितांवर होणारे हल्ले याविषयी कुरुंदकर काहीच बोलत नाही याविषयी लेखक आश्चर्य व्यक्त करतात. यावर गंगाधर गाडगीळ कुरुंदकरांना विचारतात तेंव्हा ते आपणांस खूप शिव्या भेटल्याचे सांगतात. एकूणच नामांतर चळवळीमध्ये विरोधी गटात कुरुंदकरांनी जाणं हे लेखक व नामांतरवाद्याना पटण्यासारखं नव्हतं.

नामांतर विषयी भाई माधवराव बागल यांचे योगदान महत्वपूर्ण होय. मराठवाडा विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेटचा बहुमान दिला त्या भाषणात ते म्हणतात, **'मराठवाडा विद्यापीठाचं नामांतर झालंच पाहिजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हया थोर देशभक्तांच नाव या विद्यापीठाला देण्यात, मराठवाडयाला आणि देशाला भूषणच ठरणार आहे.'**[४] असं भाई माधवराव बागल दीक्षान्त समारंभात ठणकावून सांगतात याविषयी लेखक गौरवच व्यक्त करतात.

लेखक पानतावणे बाबा दळवी यांना नामांतरवादी भूमिकेतून तुरुंगवास झाल्याचे अभिमानाने सांगतात. भिक्षु सुमेध नामांतर चळवळीमध्ये नामांतर विरोधी गटाने दंगली केल्या खेडयापाडयात घरे जाळली ही सर्व खेडी व अन्यायग्रस्त गांव, व्यक्तींना प्रत्यक्ष भेटण्याचे काम सुमेध यांनी केल्याचे नम्रपणे लेखक सांगतात. एकूणच 'स्मृतिशेष' मधून प्रत्यक्ष नामांतराची भूमिका घेणाऱ्या मोठया मनाच्या व्यक्ती येतात तशाच कुरुंदकरसारख्या नामांतर विरोधी कोत्या मनाच्या व्यक्तीही लेखक वर्णीतात.

चंद्रकांत पाटील 'चौकटी बाहेरचे चेहरे' मधून राजा ढाले यांच्या विषयी नामांतराच्या बाबतीत गौरवोद्‌गार काढतात, **'नामांतर आंदोलन जोवर विसरलं जाणार नाही तोवर राजा ढालेचं नावही राहीलच.'** (५) हा राजा ढालेचा बहुमानच म्हणावा लागेल. राजा ढाले व पँथर यांची नामांतर चळवळीतील योगदान सर्वश्रुतच आहे. हा छोटासाच संदर्भ राजा ढालेंची व नामांतर चळवळीची उंची वाढवणारा आहे. याच व्यक्ती चित्रणामधून लेखक चंद्रकांत पाटील भास्कर भोळे यांची नामांतरवादी भूमिका स्पष्ट करतात.

'जीवनरेखा' या व्यक्तिचित्रणामधून लेखक जनार्दन वाघमारे अनंतराव भालेराव, गोविंदभाई श्रॉफ यांचा 'मराठवाडा विद्यापीठा'स डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव देण्यास विरोध होता हे सत्य सांगतात मात्र हा विरोध करण्यामागे त्यांची स्वतंत्र व वेगळी भूमिका होती हेही स्पष्ट करतात.

प्रा. अविनाश डोळस यांच्या 'सम्यक दृष्टीतून' या लेखसंग्रहामधून नामांतर चळवळीचा उल्लेख येतो तर 'उद्याच्या सुंदर दिवसासाठी' या नागनाथ कोत्तापल्ले यांच्या ललितलेख संग्रहाच्या 'वटवृक्ष' या लेखातून मोईन शाकीर यांच्या नामांतराच्या भूमिकेवर नागनाथ कोत्तापल्ले प्रकाश टाकतात, **'१९७८ साली नामांतराच्या घोषनेनंतर मराठवाडयात प्रचंड जाळपोळ झाली, तेंव्हा मराठवाडयाच्या हिंसक उद्रेकाचे विश्लेषण करणारे डॉ. शाकीर हे पहिले होते.'**(६) मराठवाडयातील नामांतर विरोधी गटाच्या अमानुष अत्याचाराचा समाचार मोईन शाकीर घेतात याविषयी लेखक कोत्तापल्ले गौरव व्यक्त करतात.

सारांश, या ललितगद्याच्या माध्यमातून मराठवाडयातील नामांतर चळवळीतून दलितांवर अमानूष - अत्याचार झाले आहे हे सिध्द तर होते शिवाय पुरोगामी समजला जाणारा मराठवाडा खऱ्या स्वरुपात खूपच मागासलेला व परंपराप्रिय तसेच मानसिक आजारी असल्याचे द्योतकच या मराठवाडयातील ललित गद्यामधून संवेदनशील व तटस्थपणे अभिव्यक्त झाले आहे.

**संदर्भ :**

१) जोंधळे बी. व्ही., 'औरंगाबादेत बाबासाहेब', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती-२००२, पृ.६.
२) पानतावणे गंगाधर, 'स्मृतिशेष', सुविद्या प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती जानेवारी २००९, पृ.३४,३५.
३) तत्रैव-पृ.१०२
४) तत्रैव-पृ.१४५
५) पाटील चंद्रकांत, 'चौकटीबाहेरचे चेहरे', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, व्दितीय सुधारित आवृत्ती, २०१२, पृ.५८.
६) कोत्तापल्ले नागनाथ, 'उद्याच्या सुंदर दिवसासाठी', सायन पब्लिकेशन्स प्रा.लि.पुणे, व्दितीय आवृत्ती, २०१२, पृ.१४०.